<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३०१/२०२४</u>

<u>निशाणी क्र.१५ वर पुढे</u>

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. (०१) यांचा**

**उलटतपास**

**आरोपीकरीता श्री.के.एच.आनंदानी वकील.**

०२. मी लालबहादुर शास्त्री, परतुर येथे प्राथमीक शिक्षक म्हणुन कार्यरत होतो. मी सन २०२० मध्ये सेवानिवृत्त झालेलो आहे. माझा शेवटचा पगार महिना ६५,०००/– एवढा होता. माझी पत्नी जिल्हा परिषद शाळा सेलु येथे सहशिक्षक म्हणुन कार्यरत होती व आता सेवानिवृत्त आहे. माझ्या पत्नीचा शेवटचा पगार अंदाजे ७०,०००/– एवढा होता.

०३. आता मला नोटीस निशाणी क्र. २६ दाखविण्यात आली. सदर नोटीस माझे विधीज्ञ श्री. खोना यांनी तयार केली होती. त्या नोटीसमधील परिच्छेद क्रमांक १ ते १५ मी सांगीतल्याप्रमाणेच लिहीलेले आहेत. माझे पुरावा प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. १५ व फिर्याद माझ्या विधीज्ञांनी तयार केलेली आहे. मी आरोपीला नोटीस पाठवण्यापुर्वी वाचली होती. आरोपी चाइंम्स एवीयेशन ॲकॅडमी जिल्हा सागर मध्यप्रदेश येथे काम करीत होता. आरोपी नोटीस पाठवली त्यावेळेला अकोला येथे क्लास घेण्याचे काम करीत होता. आरोपी व त्याच्या क्लासचे नांव व संपुर्ण पत्ता मला माहिती नाही. आरोपीचे क्लासेसचे नांव रेडव्हीस एवीएशन ट्रेडींग इंस्टीटयुट असे होते.

०४. नागपुर येथील पायलटच्या माध्यमातुन माझी आरोपीशी ओळख झाली होती. माझा पुरावा प्रतिज्ञापत्रात लिहीलेला मजकुर की, आरोपी सोबत क्लासवर पहिल्यांदा ओळख झाली हे सुध्दा खरे आहे. सागर येथे माझ्या मुलीचे ॲडमीशन सन २०१९ मध्ये घेतले होते परंतु त्याची पुर्ण तारीख मला सांगता येत नाही. तसेच माझ्या मुलीची निवड कोणत्या तारखेला झाली हे मला सांगता येणार नाही. मला तेलंगाणा येथे ॲडमीशनची तारीख आठवत नाही. तसेच मला हरीयाणा व दिल्ली येथे रुजु होण्याच्या तारखा सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या माध्यमातुन माझ्या मुलाचे नागपुर येथे ॲडमीशन घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने इंस्टीट्युट चांगले आहे असे सांगीतल्यानंतर मुलाचे नागपुर येथे ॲडमीशन घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, ॲडमीशन घेण्याकरीता आरोपीने मला मदत केली होती.

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, माझी मुलगी दिल्ली येथे व्दारका पि.जी. रामपाल चौक सेक्टर ७ येथे राहत होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी तेथेच राहत होता. आता मला दस्त यादी निशाणी क्र. ३५ सोबतचे छायाचित्र दाखविण्यात आले. त्यास **वस्तु क्रमांक अ,ब व क** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, त्या छायाचित्रामध्ये माझी मुलगी व आरोपी आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी दिल्ली येथे माझ्या मुलीला मदत करीत होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी माझ्या मुलाला नागपुर येथे मदत करीत होता. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, आरोपीने नागपुर येथे फक्त ३०,०००/– रुपये भरले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझी मुलगी व आरोपी व्दारका पी.जी. येथे सोबत राहत होते.

**०६.** ज्या मित्राचा प्लॉट दाखविला होता त्याचे नांव मला माहिती नाही. सदर तथाकथीत प्लॉटच्या चतु:सिमा मला सांगता येणार नाहीत, परंतु सदर प्लॉट हा सोनेगांव रस्त्याच्या खालच्या बाजुला आहे. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत प्लॉट संबंधी लेखी करारनामा केला नव्हता. तथाकथीत प्लॉटचे दस्तऐवज मी बघीतलेले नव्हते. आरोपीच्या मित्रसोबत कोणत्या तारखेला खरेदी करायची आहे याबाबत मी चर्चा केली नव्हती. साक्षीदार सांगतो की, माझा व्यवहार हा आरोपीसोबत होता.

**०७.** आरोपीच्या खात्यामध्ये मी ७,१०,०००/– व माझ्या मुलीने १,२०,०००/– रुपये टाकले होते. सन २०१९ मध्ये मी आरोपीच्या खात्यामध्ये ५,००,०००/– रुपये टाकले होते व सदर बाब माझ्या पुराव्या प्रतिज्ञापत्रात नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी फिर्याद व पुरावा प्रतिज्ञापत्राप्रमाणे मी व माझ्या मुलीने आरोपीच्या खात्यावर एकुण ८,३०,०००/– रुपये एवढी रक्कम टाकली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या मुलाच्या खात्यावर ३१,०००/– रुपये टाकले होते. साक्षीदार सांगतो की, आरोपीने माझ्या मुलाच्या खात्यावर ३०,०००/– रुपये टाकले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने माझ्या मुलीच्या खात्यावर ५०,०००/– रुपये टाकले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीच्या धनादेशाचा गैरवापर केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत धनादेशवर असलेल्या तारखेच्या दिवशी आरोपीकडुन मला ७,५०,०००/– रुपये एवढी संपुर्ण रक्कम येणे नव्हती.

**०८.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलीने आरोपीविरुध्द कलम ४२० अंतर्गत फिर्याद दिलेली आहे. आता मला दस्त यादी निशाणी क्र. ३५ सोबतची फिर्याद

दाखविण्यात आली. तीच तक्रार माझ्या मुलीने आरोपी विरुध्द दाखल केली होती. त्यास **निशाणी क्र. ३७** देण्यात येते.

**०९**. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला नागपुर येथे प्लॅट दाखविण्याकरीता मी विनंती केली होती. मला माझ्या मुलीने दिलेल्या तक्रारीची संपुर्ण माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, एवीयेशन इंस्टीटयुटमध्ये ॲडमीशन घेतेवेळी उत्पन्नाचा दाखला लागतो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलाच्या व मुलीच्या ॲडमीशनच्यावेळी मी उत्पन्नाचा दाखला दिला होता. त्याची प्रत माझ्याकडे उपलब्ध नाही. उपलब्ध असल्यास मी दाखल करु शकतो. मी आयकर भरत होतो.

**आरोपीच्या वकीलाच्या विनंतीवरुन उलटतपास तहकुब करण्यात येतो.**

GAURAV ANANTRAO TARAL
Digitally signed by GAURAV ANANTRAO TARAL
Date: 2026.06.10 16:58:09 +0530

(जि.ए.तराळ)

दिनांक:१०.०६.२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

सेलु जि. परभणी